**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे








वर्ष ५ । अंक १५ । गुरुवार १ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainikaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


## जिल्हा बँकेच्या रणधुमाळीला वेग; चार दिवसांत ८४६ अर्जांची विक्रमी विक्री!

**बिनविरोधाच्या चर्चेला अर्जांच्या गर्दीचा धक्का; लंके मैदानात, म्हणाले 'व्यक्तीद्वोषातून बिनविरोधाचा घाट घातला तर निवडणूक होणारच!'**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकले असून, बिनविरोध निवडणुकीच्या चर्चेदरम्यानच उमेदवारी अर्जांच्या विक्रीने विक्रम गाठला आहे. अवघ्या चार दिवसांत तब्बल ८४६ उमेदवारी अर्जांची विक्री झाल्याने जिल्हा बँकेच्या राजकारणातील धुसफूस आता उघडपणे समोर आली आहे. गुरुवारी (दि. १) मोठ्या संख्येने दिग्गजांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने निवडणुकीचे चित्र अधिकच रंगतदार झाले आहे. जिल्हा बँकेच्या २१ संचालक पदांसाठी २८ सप्टेंबरपासून उमेदवारी अर्ज विक्री व दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. २८ व २९ सप्टेंबरला ५३१ अर्जांची विक्री झाली होती. त्यानंतर १ ऑक्टोबरला आणखी १६६ अर्जांची विक्री झाल्याने आतापर्यंतची संख्या ८४६ वर पोहोचली आहे. २८ व २९ सप्टेंबरदरम्यान नऊ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते.

त्यानंतर गुरुवारी अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुकांची मोठी गर्दी झाली. या निवडणुकीत खासदार निलेश लंके, आमदार काशिनाथ दाते, महानगर बँकेच्या अध्यक्षा गितांजली शेळके यांनी सेवा सोसायटी मतदारसंघातून अर्ज दाखल केला. माजी संचालक प्रशांत गायकवाड यांनी बिगरशेती मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरला. राहुरीचे हर्ष अरुण तनपुरे, अकोल्याचे माजी आमदार वैभव पिचड, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष सिताराम गायकर, आमदार किरण लहामटे, शेवगाव-पाथर्डीच्या आमदार मोनिका राजळे, श्रीगोंद्यातून नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे व अनुराधा नागवडे, कर्जतमधून अंबादास पिसाळ, जामखेडमधून अमोल राळेभात, नगरमधून जिल्हा परिषदेचे माजी सदस्य बाळासाहेब हराळ तसेच जिल्हा सहकारी बोर्डाच्या अध्यक्षा जयमाला भारत सोलेपाटील यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केले. यापूर्वी २९ सप्टेंबरला राहुरी विकास सोसायटी मतदारसंघातून आमदार प्राजक्त तनपुरे, तर कर्जत महिला मतदारसंघातून जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा मंजुषा गुंड यांनी अर्ज दाखल केला होता. २८ सप्टेंबरला माजी संचालक राहुल जगताप यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. दरम्यान, बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांच्या पातळीवर चर्चा सुरू असतानाच खासदार निलेश लंके यांनी अर्ज दाखल करून आपली भूमिका स्पष्ट केली. बिनविरोध निवडणुकीला विरोध नसल्याचे सांगतानाच व्यक्तीद्वोष किंवा राजकीय मतभेदातून बिनविरोधाचा निर्णय लादला तर तो स्वीकारला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. जिल्हा बँक ही शेतकऱ्यांची कामधेनू आहे. सध्या जिल्ह्यात दुष्काळाची गंभीर परिस्थिती असताना बँकेची निवडणूक बिनविरोध होणे गरजेचे आहे. निवडणूक बिनविरोध होत असेल तर त्याचे निश्चितच स्वागत केले पाहिजे. मात्र, व्यक्तीद्वोष ठेवून निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न झाला तर ती बिनविरोध होणार नाही, अशी भूमिका लंके यांनी मांडली.

## सेवा सोसायटी मतदारसंघातून आ. दाते; तर बिगरशेतीतून प्रशांत गायकवाड उमेदवारी अर्ज दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी गुरुवार, दि. १ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० वाजता विविध कार्यकारी सेवा सोसायटी मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्यासोबत जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत दादा गायकवाड यांनी बिगरशेती मतदारसंघातून, तर सौ. सोनल गायकवाड यांनी महिला राखीव मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या वेळी आमदार काशिनाथ दाते सर यांच्यासह प्रशांत गायकवाड व सौ. सोनल गायकवाड उपस्थित होते. यावेळी पारनेर महायुतीतील विविध घटक पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. यावेळी भाजप नेते राहुल पाटील शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंत चेडे, सुधामती कवाद, सुषमा रावडे, अपर्णा खामकर, दिनेश बाबर, अशोक चेडे, पंकज कारखिले, सुभाष दुधाडे, दत्तानाना पवार, सुनील थोरात, विठ्ठल कवाद, बाळासाहेब नरसाळे, तेजस चौधरी, विकास रोहकले, ज्ञानेश्वर औटी, संतोष शेलार, लहू भालेकर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर आमदार ■ पान ४ वर

## ऑक्टोबर महिन्यात 'सायबर सुरक्षितता' अभियान

**सायबर फसवणूक रोखण्यासाठी विविध उपक्रमांतून जनजागृती । 'डिजिटल अरेस्ट'च्या फसवणुकीपासून ज्येष्ठ नागरिकांनी विशेष सावध राहावे – पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आगामी सणासुदीच्या काळात ऑनलाइन व्यवहार, डिजिटल पेमेंट आणि ऑनलाइन खरेदीमध्ये वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन अहिल्यानगर जिल्ह्यात आज पासून संपूर्ण ऑक्टोबर महिन्यात 'सायबर सुरक्षितता' अभियान राबविण्यात येणार आहे. संपूर्ण महिनाभर नागरिकांना सायबर गुन्हे आणि ऑनलाइन आर्थिक फसवणुकीपासून सुरक्षित राहण्यासाठी विविध उपाययोजना तसेच व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. नागरिकांनी विशेषतः ज्येष्ठ नागरिकांनी सायबर सुरक्षेबाबत अधिक सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केले आहे.

नवरात्रोत्सव, दसरा आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन खरेदी व डिजिटल व्यवहार वाढतात. याच संधीचा फायदा घेत सायबर गुन्हेगारांकडून आकर्षक ऑफर, बनावट वेबसाइट, फेक कस्टमर केअर, संशयास्पद लिंक, ओटीपी, युपीआय तसेच गिफ्ट व्हाउचर, कॅशबॅक आणि बक्षिसांचे आमिष दाखवून नागरिकांची आर्थिक फसवणूक केली जाऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी अनोळखी लिंकवर क्लिक करणे किंवा संशयास्पद संदेशांना प्रतिसाद देणे टाळावे.

ऑनलाइन खरेदी करताना संबंधित ई-कॉमर्स कंपनी किंवा वेबसाइट अधिकृत असल्याची खातरजमा करावी. अवास्तव सवलत किंवा अत्यल्प किमतीत वस्तू मिळण्याचे आमिष दाखविणाऱ्या लिंकपासून सावध राहावे. सोशल मीडिया, SMS, WhatsApp किंवा ई-मेलद्वारे आलेल्या संशयास्पद लिंकवरून कोणतेही पेमेंट करू नये.

ऑनलाइन ऑर्डर केल्यानंतर डिलिव्हरी, कस्टम ड्युटी किंवा अन्य कारण सांगून अतिरिक्त पैसे मागितल्यास संबंधित कंपनीच्या अधिकृत माध्यमातून त्याची पडताळणी करावी. OTP, UPI PIN, ATM/डेबिट/क्रेडिट कार्ड क्रमांक, , इंटरनेट बँकिंगचा पासवर्ड किंवा अन्य गोपनीय आर्थिक माहिती कोणत्याही व्यक्तीला देऊ नये.

'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली फसवणुकीचा धोका

सायबर गुन्हेगार पोलीस, , , कस्टम, न्यायालय किंवा अन्य सरकारी यंत्रणेचे अधिकारी असल्याचे भासवून नागरिकांना फोन किंवा व्हिडिओ कॉल करू शकतात. संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल असल्याचे, त्याच्या नावाने पार्सलमध्ये अमली पदार्थ किंवा बेकायदेशीर वस्तू आढळल्याचे किंवा बँक खाते मनी लॉन्डरिंगसाठी वापरले जात असल्याचे सांगून 'डिजिटल अरेस्ट' केल्याचा बनाव केला जाऊ शकतो.

अशा वेळी घाबरून जाऊन कोणतेही पैसे पाठवू नयेत. पोलीस किंवा कोणतीही सरकारी यंत्रणा व्हिडिओ कॉलवर नागरिकाला 'डिजिटल अरेस्ट' करून तातडीने पैसे ट्रान्सफर करण्यास सांगत नाही. त्यामुळे असा कॉल आल्यास तो फसवणुकीचा प्रयत्न असू शकतो. कॉल करणाऱ्या व्यक्तीची ओळख स्वतंत्रपणे पडताळून पाहावी आणि गरज असल्यास थेट जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

**ज्येष्ठ नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी**

ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य करून 'डिजिटल अरेस्ट'सह विविध प्रकारच्या सायबर फसवणुका केल्या जाऊ शकतात. त्यामुळे कुटुंबीयांनी ज्येष्ठ नागरिकांना अशा फसवणुकीच्या पद्धतींबाबत माहिती द्यावी. अनोळखी व्यक्तीचा व्हिडिओ कॉल आल्यास तो कट करावा, संबंधित पोलीस ठाणे किंवा संस्थेच्या अधिकृत क्रमांकावर स्वतःहून संपर्क साधावा आणि कुटुंबातील विश्वासू व्यक्तीशी तातडीने चर्चा करावी.

'तुमचे खाते बंद होणार आहे', ' अपडेट करा', 'तुमच्या नावावर गुन्हा दाखल आहे', 'तुमच्या नावाने पार्सल सापडले आहे', 'तुम्हाला अटक होणार आहे' किंवा 'पैसे सुरक्षित खात्यात ट्रान्सफर करा' अशा धमकीवजा संदेशांवर विश्वास ठेवू नये.

**क्युआर कोड, युपीआय आणि बनावट कस्टमर केअरपासून सावध**

पैसे मिळण्यासाठी कोड स्कॅन करावा किंवा टाकावा लागतो, असा गैरसमज निर्माण करूनही फसवणूक केली जाते. पैसे प्राप्त करण्यासाठी कोड स्कॅन करणे किंवा टाकणे आवश्यक नसते. कोणताही व्यवहार करण्यापूर्वी प्राप्तकर्त्याचे नाव आणि रक्कम तपासावी. बँक, विमा कंपनी, कुरिअर, ई-कॉमर्स कंपनी किंवा अन्य सेवांचा कस्टमर केअर क्रमांक शोधताना अधिकृत वेबसाइट किंवा अधिकृत ॲपचा ■ पान ४ वर

## टंचाई परीस्थीतीला सामोरे जाताना प्रशासकीय यंत्रणेने संवेदनशीलपणे काम करावे- ना. राधाकृष्ण विखे पाटील

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**जामखेड–** टंचाई परीस्थीतीला सामोरे जाताना प्रशासकीय यंत्रणेने अतिशय संवेदनशीलपणे काम करावे.कोणताही नियम आणि कायद्याची अडचण सांगून शेतकऱ्यांमध्ये गैरसमज पसरवू नका.शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असून जामखेड तालुका दुष्काळमुक्त करण्यासाठी जलसंपदा विभागाने महत्वपूर्ण निर्णयांची कार्यवाही सुरू केली आहे. कुकडी धरण समूहातील पाण्याचा लाभ आवर्तनाच्या माध्यमातून देण्याबाबत निश्चित विचार करण्याची ग्वाही जलसंपदा तथा पालक मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

मंत्री विखे पाटील यांनी जामखेड तालुक्यातील दुष्काळी परीस्थीतीचा आढावा घेतला.आरणगाव येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जावून शेती पीकांची पाहाणी करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. कर्जत जामखेड तालुक्यातील दुष्काळी भागातील प्रश्न समजावून घेण्यासाठी आढावा बैठक सभापती प्रा राम शिंदे यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.आ.सुनिल कर्जतकर भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग नगराध्यक्षा सौ.प्रांजली चिंतामणी अतिरीक्त जिल्हाधिकारी शैलेंद्र हिंगे अधिक्षक अभियंता अलका अहीरराव वीज कृषी अधिकारी सुधाकर बोराळे वितरण कंपनीचे रमेश पवार जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी दशरथ दिघे प्रांताधिकारी नितीन पाटील विनायक देशमुख अंबादास पिसाळ यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

दुष्काळी भागाला न्याय देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलदगतीने निर्णय केले.पाण्याचे पाणी राखून ठेवतानाच जनावारांसाठी चारा व पाण्याचे नियोजन प्राधान्य आहे.तालुक्यात चारा उत्पादन होण्यासाठी पशुसंवर्धन आणी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकत्रित नियोजन करण्याच्या सूचना केल्या. पंचनामे सर्वाचे परीस्थीती गंभीरहोतील. .मदतीपासून कोणी वंचित राहाणार नाही आशी असे स्पष्ट करून टॅकर नियोजन करण्यासाठी ग्रामसेवक तलाठी यांनी उपस्थित राहाणे सक्तीचे करावे.परीस्थीती गंभीर असल्याने प्रत्येक विभागाचे अधिकारी, क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी समन्वय ठेवून काम करावे.खोटी माहीती बैठकीत देवू नये.अधिकार्यांच्या हलगर्जीपणा मुळे लोकांमध्ये रोष निर्माण होवू देवू नका.कारवाई करण्यास भाग पाडू नका असा इशारा मंत्री विखे पाटील यांनी दिला.

अतिवृष्टीमुळे नूकसान झालेल्या कवडगाव चौंडी जवळा या कोल्हापूर बंधार्याची काम,मोहरी तलावाचा सांडवा,तसेच कुकडी कालव्यांची अतिवृष्टीमुळे झालेल्या नूकसानग्रस्त भागाच्या दुरूस्तीसाठी निधीची उपलब्धता जलसंपदा विभागाने करून दिली असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले. सभापती राम शिंदे यांनी तालुक्यातील ■ पान ४ वर

## सफाई कर्मचारी हेच शहराचे खरे आरोग्यदूत – महापौर ज्योतीताई गाडे

**सफाई मित्र सुरक्षा शिबिरात कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी । सफाई कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी, औषधोपचार व आरोग्य साहित्याचे वाटप**






**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत सफाई मित्र सुरक्षा शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना औषधोपचार व आरोग्य साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट सफाई कर्मचारी पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. सफाई मित्र सुरक्षा शिबिराचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे व आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वच्छता दूत सुरेश खामकर, डॉ. अमोल बागुल, घनकचरा विभागाचे प्रमुख रामदिन यांच्यासह डॉक्टर, अधिकारी व सफाई कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, सफाई कर्मचारी हे शहरातील नागरिकांचे खऱ्या अर्थाने आरोग्यदूत आहेत. ऊन, वारा, पाऊस यांची पर्वा न करता ते पहाटेपासून शहराच्या स्वच्छतेचे काम करतात. त्यामुळे शहरातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहण्यास मोठी मदत होते.

शहराची स्वच्छता राखणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचे आरोग्यही सुदृढ व निरोगी राहणे आवश्यक आहे. त्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून सफाई कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी तसेच मोफत औषधोपचार करण्यात आले आहेत. सफाई कर्मचारी निरोगी राहिले तर त्याचा सकारात्मक परिणाम शहरातील नागरिकांच्या आरोग्यावरही होईल. त्यामुळे सफाई कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, महानगरपालिकेत सुमारे ७०० सफाई कर्मचारी काम करीत असून, शहराच्या स्वच्छतेवर सुमारे ९ कोटी रुपये खर्च होत आहेत. आपण काम करीत असताना शहराच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष देऊन नागरिकांचे समाधान होणे गरजेचे आहे. स्वच्छता विभागाला अजूनही स्वच्छतेच्या कामावर मोठ्या प्रमाणात लक्ष द्यावे लागणार आहे. यासाठी प्रत्येक सफाई कर्मचाऱ्याने १०० टक्के योगदान द्यावे.

कामामध्ये कामचुकारपणा करू नये. महानगरपालिका संस्थेबाबत प्रामाणिकपणा ठेवून प्रत्येक कर्मचाऱ्याने आपले कर्तव्य पार पाडावे. सफाई कर्मचारी घाणीत जाऊन काम करीत असल्याने त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी महापालिकेच्या माध्यमातून वर्षातून दोन वेळा आरोग्य तपासणी केली जाते. तसेच आरोग्याची काळजी घेण्यासाठी आवश्यक साहित्याचे वाटपही केले जाते, असे डांगे यांनी सांगितले.

महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात व्यसनाचे प्रमाण असल्याचे तसेच काही कर्मचारी खासगी सावकारांकडून व्याजाने पैसे घेत असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी नमूद केले. खासगी सावकारांकडून कर्ज घेतल्यानंतर काही वेळा कर्मचाऱ्यांकडून बँकेचे पासबुक किंवा क्रेडिट कार्ड ताब्यात घेतले जाते आणि पगार झाल्यानंतर व्याजासह रक्कम काढून घेतली जाते. त्यामुळे कर्मचारी आर्थिक संकटात व कर्जबाजारीपणात सापडतो. त्यामुळे सफाई कर्मचाऱ्यांनी व्यसनापासून तसेच खासगी सावकारांकडून कर्ज घेण्यापासून दूर राहावे. गरज असल्यास ■ पान ४ वर

## नागरिकांनी जबाबदारीची स्वयंशिस्त लावावी - आमदार संग्राम जगताप

**सेवा ही स्वच्छता! महास्वच्छता अभियानात ४९५ श्री सदस्यांचा सहभाग, अहिल्यानगर महानगरपालिका सेवा संकल्प अभियान संपन्न । १२ किलोमीटर रस्त्यांची स्वच्छता; ९६०० किलो कचरा उचलला**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**





**अहिल्यानगर–** महात्मा गांधी जयंतीच्या आदल्या दिवशी अहिल्यानगर शहरात अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत 'स्वच्छता ही सेवा' उपक्रम राबविण्यात आला. महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महास्वच्छता अभियानात ४९५ श्री सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत सुमारे १२ किलोमीटर रस्त्यांची स्वच्छता केली. या मोहिमेत तब्बल ९६०० किलो कचरा उचलण्यात आला. विशेष म्हणजे, मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी स्वतः या स्वच्छता अभियानात सहभागी होत शहरातील विविध ठिकाणी जाऊन श्री सदस्यांसोबत कचरा उचलला.

अस्वच्छतेमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे श्री सदस्य कोणत्याही आदेशाची वाट न पाहता स्वतःहून स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले. शहरातील विविध भागांमध्ये रस्ते, परिसर आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, नागरिकांची मानसिकता बदलणे आणि स्वच्छतेबाबत जनजागती करणे ही काळाची गरज आहे. अनेक नागरिक स्वतःचे घर स्वच्छ ठेवतात; मात्र घराबाहेरील परिसर अस्वच्छ ठेवतात. हातातील कचऱ्याची पिशवी रस्त्यावर, नदी-नाल्यांमध्ये आणून टाकल्याने परिसर अस्वच्छ होतो. पुणे आणि मुंबईसारख्या शहरांमध्ये नागरिक ओला व सुका कचरा वेगळा करून त्याची विल्हेवाट लावतात. आपल्या शहरातही अशा पद्धतीला चालना देण्यासाठी व्यापक जनजागृती करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### देशपांडे हॉस्पिटल क्लॅरिटी आय केअर येथे २ ऑक्टोबर रोजी मोफत नेत्र तपासणी शिबीर



अहिल्यानगर- शहरातील आनंदी बाजार येथील देशपांडे हॉस्पिटल आणि क्लॅरिटी आय केअर येथे दि.२ ऑक्टोबर २०२६ रोजी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते दुपारी २ यावेळेत हे शिबिर होणार आहे. अनुभवी नेत्ररोगतज्ज्ञ व रेटिना सर्जन डॉ. हितेशी जैन या रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील. मोतीबिंदू आणि मधुमेहामुळे होणारे डोळ्यांच्या पडद्याचे विकार (डायबेटिक रेटिनोपॅथी) ही दृष्टी कमी होण्याची प्रमुख कारणे असतात. शिबिरात यांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल. रुग्णांची सर्वसमावेशक नेत्र तपासणी करण्यात येईल आणि तपासणीच्या निष्कर्षांनुसार योग्य उपचारांचा सल्ला दिला जाईल. हॉस्पिटलमध्ये नेत्र तपासणी व उपचारांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यामुळे दृष्टीदोष असलेल्यांना लवकर दिलासा मिळण्यास मदत होते. शिबिरात सहभागी रूग्णांच्या रक्तातील साखरेची तपासणी ५० टक्के सवलतीत केली जाईल. तसेच पुढील उपचारांसाठी आवश्यक इतर तपासण्या सवलतीच्या दरात केल्या जातील. लवकर निदान आणि वेळेवर उपचार केल्यास दृष्टी जपण्यास मदत होऊ शकते.मोतीबिंदू तपासणी किंवा मधुमेहामुळे होणाऱ्या रेटिनोपॅथीचे निदान व उपचार यांचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या जास्तीत जास्त रूग्णांनी शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क: ८०८०४ ९६१२२.

### सामाजिक कार्यासाठी श्री मनोज छाजेड यांना 'सूर्यदत्ता बन्सीरत्न मानव सेवा पुरस्कार'



पुणे : रक्तदान, पर्यावरण संवर्धन, आरोग्यसेवा आणि आपत्तीच्या काळातील मदतकार्य अशा विविध क्षेत्रांत केलेल्या योगदानाबद्दल श्री मनोज छाजेड यांना 'सूर्यदत्ता बन्सीरत्न मानव सेवा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. श्री छाजेड यांच्या पुढाकाराने गेल्या १९ वर्षांपासून रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जात आहे. या उपक्रमातून आतापर्यंत सुमारे २५ हजार रक्तपिशव्यांचे संकलन झाले असून, पुणे आणि परिसरातील गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध करून देण्यात त्याचा मोठा उपयोग झाला आहे. पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रातही श्री छाजेड यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. मुळशी येथील सेरानो फार्म्स परिसरात गेल्या १५ वर्षांत सुमारे एक लाख वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. वृक्षलागवडीबरोबरच त्यांच्या संगोपनावरही भर देण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.नगर येथील स्कायब्रिजचे विकासक म्हणून कार्यरत असताना श्री छाजेड यांनी विविध सामाजिक आणि सेवाभावी संस्थांच्या उपक्रमांना सहकार्य केले. नगर येथील गोशाळा, स्नेहालय आणि आनंदधाम यांसह आनंदऋषीजी नेत्र रुग्णालयाच्या निवासी भवनाच्या उभारणीसाठी त्यांनी मदत केली. तसेच विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या समाजोपयोगी उपक्रमांनाही त्यांनी सहकार्य केले आहे. कोविड-१९ महामारीच्या काळात जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनच्या तीन कोविड केंद्रांच्या उभारणी आणि व्यवस्थापनासाठी त्यांनी सहकार्य केले. श्रीगोंदा येथे कोविड उपचार केंद्र उभारण्यासाठीही त्यांनी पुढाकार घेतला.

### प्रा. अमोल खाडे यांना 'युवा सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार' जाहीर



अहिल्यानगर - सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाची दखल घेत त्यांचा सन्मान करणाऱ्या आधार बहुउद्देशीय सामाजिक सेवाभावी संस्थेच्या वतीने यंदाचा 'युवा सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार' प्रा. अमोल बाबासाहेब खाडे यांना जाहीर करण्यात आला आहे. ध्वनी प्रदूषणाविरोधात सातत्याने केलेल्या जनजागृती व प्रबोधनात्मक कार्याची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. संस्थेचे अध्यक्ष सुदाम विलास लगड यांनी प्रा. अमोल खाडे यांना पत्राद्वारे पुरस्कार निवडीची माहिती दिली. आधार बहुउद्देशीय सामाजिक सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींची निवड करून त्यांचा पुरस्काराने गौरव करण्यात येतो. यंदा ध्वनी प्रदूषणासारख्या गंभीर सामाजिक व पर्यावरणीय प्रश्नाबाबत जनजागृती आणि प्रबोधनाचे कार्य करणाऱ्या प्रा. खाडे यांच्या योगदानाची विशेष दखल घेण्यात आली आहे.

## अहिल्यादेवी महिला कल्याणकारी योजना व बचत गट संघटनेची स्थापना

### अध्यक्षपदी विद्या एक्कलदेवी यांची निवड



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महिलांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासोबतच बचत गटांच्या माध्यमातून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने अहिल्यादेवी महिला कल्याणकारी योजना व बचत गट संघटनेची स्थापना करण्यात आली. संघटनेच्या अध्यक्षपदी सौ. विद्या एक्कलदेवी यांची निवड करण्यात आली.

भारतीय जनता पार्टी ओबीसी शहर जिल्हाध्यक्ष सौ. स्वाती सिरसुल यांच्या पुढाकाराने दिल्लीगेट येथील जनसंपर्क कार्यालयात 'शासकीय योजना व बचत गट' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. सभेच्या अध्यक्षस्थानी नगरसेविका सौ. मयुरी जाधव होत्या. यावेळी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

प्रारंभी दीपप्रज्वलन करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. चर्चासत्रात महिलांनी विविध अडचणी व शासकीय योजनांबाबत चर्चा केली. वंचित व गरजू महिलांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी संघटितपणे काम करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सौ. स्वाती सिरसुल यांनी नूतन अध्यक्षा विद्या एक्कलदेवी यांच्या सामाजिक व बचत गट क्षेत्रातील कार्याची माहिती दिली. गेल्या १५ वर्षांहून अधिक काळ त्या बचत गटांच्या माध्यमातून कार्यरत असून, त्यांनी १०० हून अधिक बचत गटांची निर्मिती करून एक हजाराहून अधिक महिलांना जोडल्याचे त्यांनी सांगितले. २०१३ मध्ये सावेडी भागात महिलांच्या उत्कर्षासाठी बचत गट संस्थेची नोंदणी करून त्या सातत्याने कार्यरत असल्याचेही सांगण्यात आले. यावेळी सौ. सिरसुल यांच्या हस्ते विद्या एक्कलदेवी यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना विद्या एक्कलदेवी यांनी प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, उज्ज्वला गॅस योजना, प्रधानमंत्री उद्योजकता व कौशल्य विकास योजना, संजय गांधी निराधार योजना, विधवा निवृत्ती वेतन योजना, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना, महिला सन्मान योजना, लेक लाडकी योजना, घरेलू कामगार कल्याण योजना, बेबी केअर किट योजना तसेच लाडकी बहीण योजना आदी विविध योजनांची माहिती दिली. या योजनांची केवळ माहिती न घेता पात्र महिलांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले.

संघटनेच्या कार्याध्यक्षपदी सौ. स्वाती सिरसुल, उपाध्यक्षपदी सौ. स्वाती पवळे व सौ. सुनीता कुरापट्टी, सचिवपदी सौ. ज्योती कुलकर्णी, सहसचिवपदी कांचन शिंदे आणि खजिनदारपदी सौ. वंदना बोरलीकर यांची निवड करण्यात आली. सदस्यपदी प्रिया कनोरे, मंगल गाजरे, पूजा राठोड, अंकिता सोनवणे, मयुरी गारुडकर, सुजाता वाघ, छाया सुडके, उषा बेंद्रे, मीरा गदादे, प्रियंका अग्रवाल, सोनी निकम, वर्षा राऊत, निशा ढगे, मानसी कांबळे, लीना परदेशी, पूजा पाठक, सोनी उन्हाळे, दीपा चिल्का, रजनी कोडम, शांता बिजा, वासंती मुनगेल, मीरा भगत व दिपाली लंगोटे यांची निवड झाली.

## पेमराज सारडा महाविद्यालयात कर्करोग जनजागृती कार्यक्रम संपन्न

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** हिंद सेवा मंडळाचे पेमराज सारडा महाविद्यालय आणि राष्ट्रीय सेवा योजना व आरंभ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आज कर्करोग जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाची सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले प्रतिमा पूजनाने झाली.

कर्करोग तज्ज्ञ डॉ.तेजश्री जुनागडे या होत्या.त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की,आपली जीवनशैली बदलली असून फॅटी आहार व पाश्चात्त्य जीवनशैलीचे अनुकरण ही कर्करोगाची कारणे आहेत. तोंडात न भरणारी जखम, असामान्य रक्तस्राव,गाठ, वजन अचानक कमी होणे, दुर्लक्ष करू नका.वर्षातून एकदा तपासणी करणे आवश्यक आहे.ब्रेस्ट कॅन्सर हा लवकर निदान झाल्यास १०० टक्के बरा होऊ शकतो. त्यासाठी अर्ली स्टेजमध्ये निदान होणे गरजेचे आहे.अनुवंशिकता फक्त ५ टक्के असते.वर्षातून एकदा मॅमोग्राफी करणे आवश्यक असून कर्करोग रुग्णाला मानसिक आधार देणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित या होत्या.यावेळी डॉ.गावित म्हणाल्या ,भारतीय संस्कृतीत सांगितल्याप्रमाणे ''आरोग्यम् धनसंपदा''उत्तम आरोग्य हीच खरी धनसंपदा आहे.आज कर्करोगाने मृत्यू पावणाऱ्या रुग्णांची संख्या जास्त आहे.येथील दोन महिला प्राध्यापकांनी कर्करोगावर मात केली आहे.ही आनंदाची बाब असून विद्यार्थ्यांमध्येही याबाबत जागरूकता निर्माण होणे आवश्यक आहे.

स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.कल्याणी चौधरी यांनी गर्भाशयाच्या कर्करोगाबाबत माहिती दिली. कर्करोग होऊच नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक आहे. तंबाखू, सिगारेट,दारूचे व्यसन पूर्णपणे टाळा.४०% कर्करोग व्यसनामुळे होतात.फॅटी, जंकफुड टाळा.हिरव्या पालेभाज्या,फळे,कडधान्य असा योग्य आहार घ्यावा.एचपीव्ही लस घेणे आवश्यक असून वयाच्या ९ वर्षांनंतर ही लस घेता येते,असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी आरंभ फाउंडेशनचे मेडिकल ऑफिसर डॉ.वसंत खरात म्हणाले की,कॅन्सरचे रुग्ण शेवटच्या टप्प्यामध्ये असताना आरंभ या संस्थेकडे येतात.यावेळी रुग्णांचे मनोबल उंचावणे,आनंदी ठेवणे,त्यांच्या वेदना कमी करणे व भावनिक आधार देणे हाच आमचा प्रयत्न असतो. आपणही आपल्या कुटुंबामध्ये,समाजामध्ये, नातेवाईकांमध्ये व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी प्रयत्न करू शकतो.

आरंभ फाउंडेशनचे अध्यक्ष सुधीर लांडगे म्हणाले, आरंभ फाउंडेशन कर्करोगाबाबतची चुकीची माहिती दूर करण्याचे काम करते,असे त्यांनी सांगितले. तसेच यावेळी फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रदीप काकडे यांनी मनोगत व्यक्त केले.

## जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेत कर्नल परब्स् स्कूल अ गुरुकुलच्या खेळाडूंचे लक्षणीय यश



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सोमैय्या विद्यामंदिर, लक्ष्मीवाडी, ता. राहाता येथे दि. २१ सप्टेंबर रोजी पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेत कर्नल परब्स् स्कूल अ गुरुकुलच्या खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट खेळाचे दर्शन घडवत लक्षणीय यश संपादन केले.

१४ वर्षे वयोगटात कर्नल परब्स् स्कूलचे रिदान सारडा, समदर्श पुरसवाणी व विहान भगत यांनी सांघिक खेळात उल्लेखनीय कामगिरी करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. त्यांच्या अचूक, उत्कृष्ट समन्वय आणि आत्मविश्वासपूर्ण खेळामुळे कर्नल परब्स् स्कूलच्या संघाने विजयी कामगिरी करत विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी दिमाखात प्रवेश केला.

या स्पर्धेत अहिल्यानगर, कोपरगाव, संगमनेर, राहाता, प्रवरा, पारनेर आदी तालुक्यांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अशा चुरशीच्या जिल्हास्तरीय स्पर्धेत कर्नल परब्स् स्कूलच्या खेळाडूंनी मिळवलेले हे यश त्यांच्या कठोर सरावाचे, जिद्दीचे आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित असल्याचे मानले जात आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल कर्नल परब्स् स्कूलच्या संस्थापिका सौ. गिता परब, संचालक श्री. दिलीप परब, श्री. रिकीराज परब आणि मुख्याध्यापिका कु. अर्पिता रणनवरे, शिक्षकवृंद व पालकांनी विजयी खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले. खेळाडूंना शाळेचे क्रीडा शिक्षक श्री. सौरभ सानप यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

कर्नल परब्स् स्कूल विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा कौशल्याला सातत्याने प्रोत्साहन देत असून, या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशस्वी वाटचालीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या प्रसंगी विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंना विद्यालयाच्या वतीने पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## गुणांपलीकडचे मुलांमध्ये शिक्षण घडविण्याचे शिक्षकांना धडे

### 'कौशल बोध' मधून शिक्षकांना कौशल्याधारित शिक्षणाची नवी दिशा; चित्रकुट इंटरनॅशनल स्कूलमध्ये विशेष कार्यशाळा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देण्याऐवजी त्यांच्यामध्ये प्रत्यक्ष जीवनातील कौशल्ये, सर्जनशीलता, आत्मविश्वास, स्वावलंबन आणि श्रमाची प्रतिष्ठा रुजविण्याच्या उद्देशाने अहिल्यानगर शहरातील चित्रकूट इंटरनॅशनल स्कूल येथे शिक्षकांसाठी 'कौशल बोध' या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कौशल्याधारित आणि अनुभवाधारित शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याबाबत या कार्यशाळेत शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले.

हे अधिकृत प्रशिक्षण सीबीएसईच्या स्किल एज्युकेशन युनिट, दिल्लीकडून आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी अशोक सचदेव यांची स्किल एज्युकेशन युनिटचे मास्टर ट्रेनर म्हणून नियुक्ती करण्यात आली होती आणि सीबीएसईच्या वतीने त्यांनी हे प्रशिक्षण आयोजित करून घेतले. 'कौशल बोध' हा विषय यावर्षीपासून इयत्ता ६वी, ७वी आणि ८वीसाठी अधिकृतपणे अनिवार्य करण्यात आला आहे.

या कार्यशाळेसाठी श्रीमती स्वेक्षणा मित्रा आणि अशोक सचदेव यांनी मास्टर ट्रेनर म्हणून मार्गदर्शन केले. शिक्षकांचा सक्रिय सहभाग घेऊन विविध कृती, अनुभवाधारित उपक्रम, संवाद आणि चर्चांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यविकासाची प्रक्रिया अधिक परिणामकारक पद्धतीने कशी राबविता येईल, याचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा केंद्रबिंदू केवळ परीक्षेतील गुण किंवा पाठ्यपुस्तकातील ज्ञान न राहता, त्यांना भविष्यातील आव्हानांना आत्मविश्वासाने सामोरे जाण्यास सक्षम करणे आवश्यक असल्याचे कार्यशाळेत अधोरेखित करण्यात आले. दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्याची क्षमता, सर्जनशील विचार, निर्णयक्षमता, संवादकौशल्य, सहकार्याची भावना, स्वावलंबन आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभव या बाबी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यशाळेत मार्गदर्शन अशोक सचदेव म्हणाले की, शिक्षणाचा अंतिम उद्देश केवळ चांगले गुण मिळवणे नसून विद्यार्थ्यांना जीवनातील विविध आव्हानांना आत्मविश्वासाने सामोरे जाण्यास सक्षम बनविणे हा आहे. कौशल्य हे केवळ रोजगार मिळविण्याचे साधन नसून आत्मनिर्भरता आणि व्यक्तिमत्त्व विकासाचा भक्कम पाया आहे. आजच्या बदलत्या काळात विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न ठेवता त्यांना जीवनोपयोगी कौशल्यांचे शिक्षण देणे आवश्यक आहे. ' 'पासून ' 'कडे शिक्षणाचा प्रवास घडविण्यासाठी शाळांमध्ये कौशल्याधारित व अनुभवाधारित शिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी गरजेची असल्याचे कार्यशाळेत त्यांनी स्पष्ट केले.

श्रीमती स्वेक्षणा मित्रा म्हणाल्या की, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध कृतींमध्ये सहभागी करून घेत त्यांच्यातील सुप्त गुण आणि कौशल्ये ओळखणे, त्यांना प्रोत्साहन देणे तसेच प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढण्याबरोबरच स्वतंत्रपणे विचार करण्याची आणि समस्यांवर उपाय शोधण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## श्री कोरठण खंडोबा मंदिरावरील सुवर्ण कळसाला तडा गेलेला नाही; कळसाला पंचधातूंचा संयोग!

### ३० वर्षांपूर्वी कळस शिखर बांधकाम केलेल्या कारागिराकडून निर्वाळा । विश्वस्तांकडून पत्रकाद्वारे माहिती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी


१९९७ – मुख्य सुवर्ण कळस

**पिंपळगाव रोठा–** लाखो भाविक भक्तांचे कुलदैवत आणि श्रद्धास्थान राज्यस्तरीय ''ब'' वर्ग तीर्थक्षेत्र असलेले श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थान, पिंपळगाव रोठा, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर या मंदिराच्या मुख्य कळसावर सोमवार दि. २१ सप्टेंबर रात्री विज कोसळून कळसाला तडा गेल्याची व इतर नुकसान झाल्याची बातमी, फोटो प्रसार माध्यमातून आल्यावर, लाखो भाविक भक्तांच्या श्रद्धा, भावनांना, तसेच देणगीदार, ग्रामस्थ व कळस बांधकामाचे कारागीर यांना मोठा धक्का बसला होता. त्याबाबत शेकडो भाविक भक्तांकडून विचारणा होत होती. देवस्थानच्या आजवरच्या इतिहासातील ही पहिलीच घटना असल्याने ग्रामस्थ. भाविक भक्त यांच्याकडून सांगितले जात आहे. सुवर्ण कळसासाठी आणि कळस शिखर बांधकामासाठी लाखो भाविक भक्त, देणगीदार यांनी योगदान व दान दिलेले आहे.

म्हणून देवस्थान विश्वस्तांकडून विनंती केलेनुसार, मंदिराचे सुवर्ण कळसाला तडा गेल्याची पाहणी करणेसाठी ३० वर्षांपूर्वी मंदिर कळसशिखराचे नविन बांधकाम करणारे कारागिरांपैकी श्री राजू ज्ञानेश्वर जाधव रा. आळे, ताः– जुन्नर यांनी रविवार दि. २७ सप्टेंबर रोजी देवस्थानला भेट देऊन मंदिरावरील मुख्य सुवर्ण कळसाचे निरीक्षण केले. आणि सुवर्ण कळसाला तडा गेलेला नसल्याचा निर्वाळाही त्यांनी दिला. सन १९९३–९४ ते सन १९९७ पर्यंत आपले वडील कै. ज्ञानेश्वर रघुनाथ जाधव (माऊली) आणि आपण स्वतः मंदिराचे नविन कळस शिखराचे बांधकाम केले आहे.

ग्रामस्थांनी श्रमदान करून घाणी बनवून चुना मळून दिल्यावर कळस बांधकामावर रापलेला चुना मध्ये घोटई व नक्षीकाम करण्यात आलेले आहे. मंदिराचे शुध्द चंपाष्ठी शुक्रवार दि. ५ सप्टेंबर १९९७ च्या भव्य कलशारोहण सोहळ्यात प. पू. स्वामी गगनगिरी महाराज यांनी सुवर्ण कळसाचे मंदिरात पुजन केल्यावर, लाखो भाविक भक्तांच्या उपस्थितीत आपण स्वतः कारागीर म्हणून सुवर्ण कळसाला पाठीवर बांधून ४५ फुट उंच कळसशिखरावर जाऊन विधीवतपणे कळस स्थापन करण्याचे भाग्य मला लाभले होते अशी आठवण त्यांनी सांगितली. सुवर्ण कळस मंदिरावर स्थापन करताना आपले कै वडिलांचे मार्गदर्शनाखाली कळसामध्ये पंचधातूंचा संयोग करण्यात येऊन कळसाला विधीवत शास्त्रीय सुरक्षा कवच करण्यात आलेले होते. आणि त्यामुळे सुवर्ण कळसाला तडा गेलेला नसावा असा निर्वाळा कारागीर राजू ज्ञानेश्वर जाधव (आळे) यांनी दिला असल्याची माहिती देवस्थानचे विधमान विश्वस्त व माजी अध्यक्ष अ‍ॅड. पांडुरंग विठ्ठल गायकवाड, विद्यमान विश्वस्त व माजी उपाध्यक्ष श्री रामदास मुळे, विधमान विश्वस्त श्री महादेव पुंडे, विश्वस्त श्री धोंडीभाऊ जगताप, विश्वस्त श्री जालिंदर खोसे, विश्वस्त श्री दिलीप घुले यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहिती दिली आहे.

## हक्काचा ५ टक्के निधी दिवाळीपूर्वी मिळावा; दिव्यांगांच्या मागणीसाठी अधिकाऱ्यांना सूचना करणार - आमदार अक्षय कर्डीले

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** शासन निर्णयानुसार ग्रामपंचायतींना दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव असलेला ५ टक्के निधी अनेक ग्रामपंचायतींनी अद्याप वाटप केलेला नाही. हा निधी दिवाळीपूर्वी पात्र दिव्यांग बांधव–भगिनींना उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी भाजपा दिव्यांग विकास आघाडीच्या वतीने आमदार अक्षय कर्डीले यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

भाजपा दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे, महिला जिल्हाध्यक्षा आशाताई गायकवाड, जिल्हा संघटक ईश्वर गुंड, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत काळे, अक्षय डहाळे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी आमदार कर्डीले यांची भेट घेऊन निवेदन दिले.

शासन निर्णय २०१६ नुसार दिव्यांगांसाठी असलेल्या ५ टक्के निधीसाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती कार्यालयांशी वारंवार पत्रव्यवहार केला आहे. मात्र, अनेक वेळा लेखी आश्वासने मिळूनही प्रत्यक्षात निधीचा लाभ दिव्यांग बांधवांपर्यंत पोहोचलेला नाही, अशी भूमिका संघटनेने मांडली. ग्रामीण भागातील दिव्यांग व्यक्तींना ग्रामपंचायत तसेच तलाठी कार्यालयाच्या पातळीवरही अपेक्षित सन्मान व सहकार्य मिळत नसल्याची खंत निवेदनातून व्यक्त करण्यात आली.

दरम्यान, ग्रामीण भागात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने अनेक दिव्यांग कुटुंबांवर आर्थिक अडचणींचे संकट आले आहे. त्यामुळे ५ टक्के निधीतून जास्तीत जास्त पात्र दिव्यांगांना मदत मिळावी आणि त्यांची दिवाळी गोड व्हावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावर आमदार अक्षय कर्डीले यांनी दिव्यांग बांधवांच्या प्रश्नाबाबत शासनस्तरावर पाठपुरावा करून संबंधित अधिकाऱ्यांना लवकरच आवश्यक सूचना करण्यात येतील, असे आश्वासन दिले. दिवाळीपूर्वी निधीच्या माध्यमातून पात्र दिव्यांगांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचेही त्यांनी सांगितले. याबद्दल उपस्थित पदाधिकाऱ्यांनी आमदार कर्डीले यांचे आभार मानले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत यश नगरकर सुवर्णपदकाचा मानकरी



अहिल्यानगर- वाडिया पार्क येथे पार पडलेल्या अहिल्यानगर महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत श्री रामकृष्ण एज्युकेशन इंग्लिश मीडियम स्कूलचा खेळाडू चि. यश गणेश नगरकर याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक (गोल्ड मेडल) पटकावले आहे. रविवार, २७ सप्टेंबर २०२६ रोजी अहिल्यानगर येथील वाडिया पार्क क्रीडा संकुलात ही स्पर्धा पार पडली. जिल्हाभरातील विविध शाळांमधून अनेक खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या तायक्वांदो स्पर्धेत यश नगरकरने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. यशाच्या या यशामागे स्टार तायक्वांदो अकॅडमीचे रविराज यादव श्री रामकृष्ण एज्युकेशन इंग्लिश मीडियमचे दीपक धनवटे व अजित लोळगे यांचे मोलाचे क्रीडा मार्गदर्शन लाभले. यशने मिळवलेल्या या दैदिप्यमान यशाबद्दल श्री रामकृष्ण एज्युकेशन इंग्लिश मीडियमच्या प्राचार्य मॅडम गगन भूतानी, शिक्षकवृंद, क्रीडाप्रेमी आणि पालकांनी त्याचे विशेष अभिनंदन केले असून पुढील क्रीडा प्रवासासाठी व भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

### अहिल्यानगर न्यू लॉ कॉलेजमध्ये विविध विधी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया

अहिल्यानगर- अहिल्यानगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या न्यू लॉ कॉलेजमध्ये तीनवर्षीय व पाचवर्षीय विधी अभ्यासक्रमांच्या संस्था पातळीवरील प्रवेश प्रक्रियेचे आयोजन करण्यात आले आहे. राज्य सामायिक प्रवेश समितीच्या () मार्गदर्शक तत्त्वांनुसार ही प्रवेश प्रक्रिया पार पडणार आहे. महाविद्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, पाचवर्षीय विधी अभ्यासक्रमासाठी दि. १ ऑक्टोबर २०२६ ते ४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे. तसेच तीनवर्षीय विधी अभ्यासक्रमासाठी दि. ३ ऑक्टोबर २०२६ ते ६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत प्रवेश प्रक्रिया होणार आहे. विधी शाखेत प्रवेश घेण्यास इच्छुक असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि त्वरित महाविद्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन न्यू लॉ कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एल. मोरे यांनी केले आहे. संपर्कासाठी तपशील: प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी व संपर्कासाठी महाविद्यालयाकडून खालील अधिकारी/प्राध्यापकांचे क्रमांक जाहीर करण्यात आले आहेत: सौ. हेमा कदम: ०२४१-२३२४०७४ प्रा. डॉ. रामेश्वर दुसुंगे (पाचवर्षीय अभ्यासक्रम): ७२४९७४०५७५ प्रा. डॉ. बाळासाहेब पांढरे (तीनवर्षीय अभ्यासक्रम): ९०२१५४४५४१ इच्छुक विद्यार्थ्यांनी मुदतीत संपर्क साधून आपला प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

### खासदार निलेश लंके यांच्या हस्ते पै. नाना डोंगरे यांचा सत्कार

अहिल्यानगर - सामाजिक, पर्यावरण, साहित्य तसेच ग्रामीण भागातील विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सातत्याने योगदान देणारे सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके यांच्या जयंतीनिमित्त नाशिक येथे प्रदान करण्यात येणारा 'चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके स्मृतीदिन सन्मान पुरस्कार' जाहीर झाला आहे. तसेच नगर तालुका तालीम सेवा संघाच्या अध्यक्षपदी त्यांची फेरनिवड झाल्याबद्दल खासदार निलेश लंके यांच्या हस्ते पै. नाना डोंगरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राम पवार, बाळासाहेब खिलारी, संतोष हांडे, सचिन कराळे, प्रविण वारुळे, गणपत शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी खासदार निलेश लंके यांनी पै. नाना डोंगरे यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात केवळ वृक्षारोपण न करता वृक्षसंवर्धनाच्या मोहिमा राबविणे, स्वच्छता अभियान, जलसंधारणाबाबत जनजागृती, रक्तदान शिबिरांचे आयोजन, मतदार जनजागृती, महिला सक्षमीकरण तसेच स्त्री जन्माचे स्वागत अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली असल्याचे लंके यांनी सांगितले.

## स्व. वैशाली सरडे स्मृती लघुनाटिका स्पर्धेचा निकाल जाहीर

### 'रसाभिनय'च्या 'पोटात दुखतंय'ला सांघिक प्रथम क्रमांक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हौशी प्रायोगिक कलावंत संघ, अहिल्यानगर शाखेच्या वतीने आयोजित स्व. सौ. वैशाली सरडे स्मृती लघुनाटिका (स्किट) स्पर्धा २०२६चा निकाल जाहीर करण्यात आला. स्पर्धेत विविध संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत दर्जेदार लघुनाटिका सादर केल्या. परीक्षकांनी अभिनय, दिग्दर्शन, सादरीकरण, आशय आणि एकूण कलात्मक प्रभाव या निकषांवर परीक्षण करून विविध पारितोषिकांची निवड केली. या स्पर्धेसाठी ज्येष्ठ रंगकर्मी पी. डी. कुलकर्णी आणि डॉ. विजयकुमार जोशी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रमुख पाहुणे अभिजित दळवी यांनी उपस्थित कलाकारांना मार्गदर्शन करताना रंगभूमीवरील सातत्य, प्रयोगशीलता आणि दर्जेदार सादरीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले. हौशी कलाकारांनी रंगभूमीशी सातत्याने जोडून राहून नवनवीन प्रयोग करावेत, असे आवाहन त्यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाने उपस्थित कलाकारांना प्रेरणा मिळाली. त्यांनी सर्व विजेत्या कलाकारांचे अभिनंदन केले.

स्पर्धेच्या सांघिक पारितोषिक विभागात 'रसाभिनय' संस्थेच्या 'पोटात दुखतंय' या लघुनाट्याने प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्या संघाला रु. ५,००१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. 'मित्रमेळा' संस्थेच्या 'नट नावाचं नाटक' या लघुनाट्याने द्वितीय क्रमांक मिळविला. त्यांना रु. ३,००१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. न्यू आर्ट्स कॉमर्स महाविद्यालयाच्या 'फोक' या लघुनाट्याने तृतीय क्रमांक पटकावला. त्यांना रु. २,००१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. तसेच नाट्यछटा ग्रुपच्या 'पारू' आणि सुपरस्टार ग्रुपच्या 'फ्रीडम' या लघुनाट्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. दोन्ही संघांना रु. १,००१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. उत्कृष्ट दिग्दर्शन विभागात तन्मय भंडारी यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना रु. ५०१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. अजिंक्य सोनवणे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला असून त्यांना रु. ३०१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक, तर पृथ्वी सुपेकर यांनी तृतीय क्रमांक मिळविला असून त्यांना रु. २०१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले.

उत्कृष्ट पुरुष अभिनय विभागात ओंकार बोथेकर यांनी प्रथम क्रमांक मिळविला. त्यांना रु. ५०१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. अजिंक्य सोनवणे यांना द्वितीय क्रमांकासाठी रु. ३०१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक, तर तेजस अतितकर यांना तृतीय क्रमांकासाठी रु. २०१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. उत्कृष्ट स्त्री अभिनय विभागात राखी गोरखा यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना रु. ५०१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. अनुजा शिंदे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला असून त्यांना रु. ३०१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक, तर समृद्धी कुलकर्णी यांनी तृतीय क्रमांक मिळविला असून त्यांना रु. २०१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. प्राप्ती अनमल आणि स्वरा सभारंजन यांना उत्तेजनार्थ पारितोषिकाने गौरविण्यात आले. त्यांना सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले.

## ३२ वर्षांची प्रदीर्घ ज्ञानसेवा: पारनेर महाविद्यालयात प्रा. डॉ. सजन खपके यांचा गौरवपूर्ण सेवापूर्ती सोहळा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पारनेर येथील वनस्पतीशास्त्र विभागाचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. सजन खपके हे ३० सप्टेंबर २०२६ रोजी आपल्या ३२ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्त महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेला सेवापूर्ती गौरव सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण व भावूक वातावरणात संपन्न झाला.

**अध्यापन व संशोधनातील मोलाचे योगदान**

डॉ. सजन खपके हे १४ सप्टेंबर १९९४ रोजी पारनेर महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले होते. आपल्या सेवाकाळात त्यांनी अध्यापन, संशोधन आणि विद्यार्थी मार्गदर्शन या क्षेत्रांत मोलाचे योगदान दिले. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून त्यांना दोन वेळा शिक्षक संशोधन शिष्यवृत्ती मंजूर झाली. त्यांनी २००२ मध्ये एम.फिल. तर २०१६ मध्ये पीएच.डी. पदवी संपादन केली. या संशोधनासाठी त्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे डॉ. के. एन. धुमाळ आणि पारनेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. आहेर यांचे मार्गदर्शन लाभले. आपल्या ३२ वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांना घडवले. वनस्पतीशास्त्र विभागातील सहकाऱ्यांच्या मदतीने विविध कार्यशाळा, तसेच राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिसंवादांचे यशस्वी आयोजन करून विभागाच्या संशोधनात्मक विकासात मोलाचा वाटा उचलला.

**मान्यवरांच्या उपस्थितीत गौरव सोहळा**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. विजय काळे उपस्थित होते. वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. रवींद्र देशमुख यांनी प्रास्ताविकातून डॉ. खपके यांच्या योगदानाचा व परिश्रमांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी प्रा. डॉ. दिलीप ठुबे, प्रा. डॉ. सुखदेव कदम, प्रा. डॉ. विजयकुमार राऊत, प्रा. डॉ. रघुनाथ नजन, प्रा. डॉ. दत्तात्रय घुंगार्डे, प्रा. डॉ. युवराज वाघेरे, प्रा. ज्योत्स्ना मस्के आणि प्रा. प्रांजल बोरुडे यांनी मनोगतातून डॉ. खपके यांच्या कार्याचा गौरव केला. तसेच शेवगाव महाविद्यालयाचे नवनियुक्त प्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. किसनराव आंबाडे, डॉ. श्रीकृष्ण गायकवाड आणि डॉ. सुनील पोकळे यांनी त्यांच्यासोबतच्या सहजीवनातील आठवणींना उजाळा दिला.

**कुटुंबीयांकडून आठवणींना उजाळा**

डॉ. खपके यांचे मेहुणे व माजी सिनेट सदस्य श्री. शिवाजीराव साबळे, त्यांची कन्या अभियंता सौ. मानसी कराळे, पत्नी सौ. वैशाली खपके यांनी डॉ. खपके यांच्या शांत स्वभावाचा, वक्तशीरपणाचा आणि शिस्तप्रियतेचा उल्लेख करत कौटुंबिक व शैक्षणिक प्रवासातील आठवणी मांडल्या. याप्रसंगी व्याही प्रा. मधुकर कराळे, सून सौ. अर्चना खपके, आंबी दवणगाव येथील अरुण खपके, माजी विद्यार्थी दत्ता बांदल, श्री. भुसारे साहेब आणि माजी नगरसेविका सौ. नलावडे यांनीही मनोगत व्यक्त केले.

**संस्थेविषयी कृतज्ञता व्यक्त करताना डॉ. खपके भावूक**

आपल्या सत्काराला उत्तर देताना डॉ. सजन खपके भावूक झाले. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेमुळे आणि महाविद्यालयामुळेच आपल्या आयुष्याला व कुटुंबाला नवी दिशा मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच आपल्या कार्यकाळात लाभलेले सर्व प्राचार्य, सहकारी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी डॉ. खपके यांच्या शैक्षणिक व संस्थात्मक कार्याचे कौतुक केले. तर प्रमुख पाहुणे डॉ. विजय काळे यांनी त्यांना सेवानिवृत्तीनंतरच्या निरोगी, आनंदी आणि समाजोपयोगी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

**मान्यवरांची मोठी उपस्थिती**

या सोहळ्यास अहमदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभिजीत कुलकर्णी, राधाबाई महिला महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. बी. के. औटी, माजी प्राचार्य डॉ. एन. एम. कदम, माजी उपप्राचार्य प्रा. सुधाकर जाधव यांच्यासह महाविद्यालयातील आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, अहिल्यानगरचे मित्रमंडळी, आंबी दवणगाव येथील ग्रामस्थ, बंधू वसंतराव खपके, पुतणे व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. हरेश शेळके यांनी केले, तर आभार प्रा. महेश आहेर यांनी मानले. सोहळ्यानंतर डॉ. खपके यांच्या वतीने सर्व उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

## आजी–माजी सैनिकांच्या आरोग्यासाठी साई माऊली हॉस्पिटलमध्ये ईसीएचएस सेवा सुरू

### शहीद परिवारांनाही मिळणार तज्ज्ञ वैद्यकीय उपचार; जय हिंद फाउंडेशन व त्रिदल सैनिक संघटनेतर्फे गिते कुटुंबीयांचा सन्मान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आजी–माजी सैनिक तसेच शहीद सैनिकांच्या कुटुंबीयांना दर्जेदार व सर्वसमावेशक आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने शहराच्या भिस्तबाग येथील साई माऊली हॉस्पिटलमध्ये ईसीएचएस () सेवा कार्यान्वित करण्यात आली आहे. या सुविधेमुळे आजी–माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांना विविध आजारांसाठी तज्ज्ञ वैद्यकीय उपचारांचा लाभ घेता येणार आहे.

साई माऊली हॉस्पिटलमध्ये ईसीएचएस सेवा सुरू झाल्याबद्दल जय हिंद फाउंडेशन व त्रिदल सैनिक संघटनेच्या वतीने हॉस्पिटलमधील डॉक्टरांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. संतोष गिते (एम.डी. मेडिसिन), डॉ. वर्षा गिते (भुलतज्ज्ञ), डॉ. गणेश गिते (एम. एस. ऑर्थो), डॉ. विजयश्री गिते (आय स्पेशालिस्ट), डॉ. तुकाराम गिते (डेंटिस्ट) आणि डॉ. दीपली गिते (बी.ए.एम.एस.) यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना डॉ. संतोष गिते म्हणाले की, सैनिक देशाच्या सीमेवर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कर्तव्य बजावत देशाच्या सुरक्षेसाठी मोठे योगदान देतात. त्यामुळे त्यांच्या तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्याची काळजी घेणे ही सामाजिक बांधिलकी आहे. सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी साई माऊली हॉस्पिटल कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

साई माऊली हॉस्पिटलमध्ये विविध आजारांवर उपचार करण्यासाठी कॅन्सरतज्ज्ञ, हाडांचे तज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, मधुमेहतज्ज्ञ, मूत्रपिंडतज्ज्ञ, मेंदू व मणक्यांचे तज्ज्ञ तसेच फुफ्फुसतज्ज्ञ यांसह विविध वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध आहे. आधुनिक वैद्यकीय सुविधांसह विविध रोगांचे निदान व उपचार सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याची माहिती हॉस्पिटल प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

## राष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेत राजलक्ष्मीने उंचावले अहिल्यानगरचे नाव

### राष्ट्रीय रँक प्राप्त करुन उमटवला नेमबाजीत कौशल्याचा ठसा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** येथील भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलची इयत्ता नववीची विद्यार्थिनी कु. राजलक्ष्मी अशोक घडेकर हिने भोपाळ (मध्य प्रदेश) येथे राष्ट्रीय रायफल असोसिएशन ऑफ इंडिया () यांच्या वतीने आयोजित २८ व्या कुमार सुरेंद्र सिंग आंतरशालेय राष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. या स्पर्धेत तिने हजारो स्पर्धकांमधून राष्ट्रीय रँक मिळवला असून, तिने ३७२ गुणांक प्राप्त केला आहे.

विशेष म्हणजे राजलक्ष्मीने रायफल शूटिंगचा सराव केवळ मागील आठ महिन्यांपासून सुरू केला आहे. या अल्प कालावधीत तिने जिल्हास्तरीय स्पर्धेत मेडल मिळवले, त्यानंतर राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली आणि आता राष्ट्रीय स्तरावरही उल्लेखनीय यश संपादन केले. रायफल शूटिंग हा एकाग्रता, अचूकता, संयम आणि मानसिक स्थैर्याची आवश्यकता असलेला खेळ असून, अल्पावधीत तिने या खेळातील कौशल्य आत्मसात केले आहे. गोवा येथे झालेल्या १३ व्या वेस्ट झोन रायफल शूटिंग चॅम्पियनशिपमध्ये तिने अजिंक्यपद पटकावले आहे.

राजलक्ष्मीने अहिल्यानगर सिटी रायफल अँड पिस्तोल स्पोर्ट्स शूटिंग क्लब येथे प्रशिक्षण घेतले असून तिला प्रशिक्षक आलिम शेख, छबुराव काळे आदींचे मार्गदर्शन लाभले. ''रायफल शूटिंगमध्ये अचूक नेम साधण्यासाठी एकाग्रता अत्यंत महत्त्वाची असते. एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीमध्ये अबॅकसच्या सततच्या सरावामुळे माझी एकाग्रता वाढण्यास मदत झाली आणि त्याचा फायदा मला रायफल शूटिंगमध्ये झाला. त्यामुळे अकॅडमीच्या माझ्या सर्व शिक्षिकांची मी आभारी आहे. पुढील आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी तयारी सुरू असून, भारताचे प्रतिनिधित्व करत उत्तुंग यश मिळवण्याचा माझा संकल्प असल्याचे राजलक्ष्मी हिने म्हटले आहे.

## मतदार यादीतील अनियमितता आणि प्रक्रियेविरोधात अहिल्यानगरमध्ये डाव्या आघाडीचे तीव्र निदर्शन

### जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना निवेदन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्राच्या मतदार यादीतून मोठ्या प्रमाणावर नावे वगळल्याच्या निषेधार्थ तसेच केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पक्षपाती भूमिकेविरोधात आज विविध डावे पक्ष आणि पुरोगामी संघटनांच्या (अहिल्यानगर – डावी आघाडी) वतीने अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. या वेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत भारताच्या मा. राष्ट्रपतींना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. या वेळी उपस्थित पत्रकारांशी बोलताना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे (–)जिल्हा समन्वयक कॉम्रेड प्रवीण सोनवणे म्हणाले की, ''महाराष्ट्राच्या मतदार यादीतून तब्बल २.०७ कोटी नावे वगळण्यात आली आहेत. ही संख्या छत्तीसगड राज्याच्या एकूण मतदारांपेक्षाही अधिक आहे. मसुदा (स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन) प्रक्रियेचा हा मोठा धक्का असून, राज्यातील एकूण ९.७९ कोटी मतदारांपैकी तब्बल २१.१४% मतदारांची नावे कमी करण्यात आली आहेत.

त्यांनी पुढे सांगितले की, ''टक्केवारी आणि एकूण संख्या अशा दोन्ही बाबतीत महाराष्ट्रात मतदारांची नावे वगळण्याचे प्रमाण उत्तर प्रदेशपेक्षाही जास्त आहे. विशेषतः २५ विधानसभा मतदारसंघांमध्ये ४०% किंवा त्याहून अधिक मतदारांची नावे काढण्यात आली आहेत. यातील बहुतांश मतदारसंघ हे मुंबई, पुणे, ठाणे आणि नाशिक जिल्ह्यांच्या परिसरातील आहेत. या सर्वाला केंद्रीय निवडणूक आयोग जबाबदार असून, त्यांनी अत्यंत पक्षपाती भूमिका घेतली आहे. त्यामुळे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवून निष्पक्ष व स्वतंत्र निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात यावी,'' अशी मागणी त्यांनी केली.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे () जिल्हा सहसचिव कॉम्रेड सुधीर टोकेकर यांनी सांगितले की, ''आम्ही निवेदनाच्या माध्यमातून प्रक्रिया तात्काळ थांबवण्याची मागणी केली आहे.

## हॉटेल व्यावसायिकाला फायटर व कोयत्याच्या मुठीने मारहाण

### २२ हजारांची रोकड व मोबाईल हिसकावल्याची तक्रार । ढवळगावात हॉटेलसमोर चौघांचा राडा; जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**बेलवंडी–** ढवळगाव (ता. श्रीगोंदा) येथील हॉटेल व्यावसायिकास हॉटेलसमोर चौघांनी शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी फायटरने डोक्यावर, तर कोयत्याच्या मुठीने पाठीवर मारहाण केल्याचा आरोप असून, खिशातील २२ हजार रुपये रोख रक्कम व सॅमसंग मोबाईल असा एकूण ३७ हजार रुपयांचा मुद्देमाल काढून घेतल्याची तक्रार बेलवंडी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. याबाबत आदेश सुरेश आढाव (वय २६, रा. ढवळगाव, ता. श्रीगोंदा) यांनी बेलवंडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

तक्रारीनुसार, आदेश आढाव यांचे ढवळगाव शिवारात येवतीकडे जाणाऱ्या रस्त्यावर 'हॉटेल रिलॅक्स गार्डन' नावाचे हॉटेल आहे. ते स्वतः हॉटेल व्यवसाय चालवतात. २९ सप्टेंबर रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास त्यांना रोहन चोरमले याचा फोन आला व हॉटेलच्या रस्त्यावर येण्यास सांगितले. त्यानंतर आढाव हॉटेलकडे गेले असता रोहन चोरमले तेथे उपस्थित होता. तक्रारीनुसार, रोहनने त्याला व त्याच्या मित्रांना जेवण करायचे असून पैसे नंतर देण्याचे सांगितले. त्यावर आढाव यांनी उधारी बंद असल्याचे सांगून जेवणाचे पैसे देऊन जाण्यास सांगितले. त्यानंतर श्रीधर ठोंबरे, प्रतिक सोबले आणि वैभव झिटे हे तेथे आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

यावेळी श्रीधर ठोंबरे याच्या हातात फायटर आणि प्रतिक सोबले याच्या हातात कोयता असल्याचा आरोप करण्यात आला आहे. चौघांनी शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. श्रीधर ठोंबरे याने फायटरने डोक्यावर, तर प्रतिक सोबले याने कोयत्याच्या मुठीने पाठीवर मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.सदरील घटना सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये कैद झाली आहे.

दरम्यान, आदेश आढाव यांच्या हाफ पॅन्टच्या खिशातील गाय विक्रीतून आलेली २२ हजार रुपयांची रोकड रोहन चोरमले याने, तर दुसऱ्या खिशातील सॅमसंग मोबाईल वैभव झिटे याने काढून घेतल्याचा आरोप आहे. मोबाईलची किंमत १५ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

मारहाणीनंतर आरोपींनी 'तू कसे काय हॉटेल चालवितो, तुझ्याकडे पाहतो' असे म्हणत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. हॉटेलमधील कामगार मदतीसाठी धावत येत असल्याचे पाहून संबंधित तेथून निघून गेल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या घटनेत रोख रक्कम व मोबाईल असा एकूण ३७ हजार रुपयांचा मुद्देमाल गेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले असून, आदेश आढाव यांनी संबंधित चौघांविरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली आहे. घटनेबाबत बेलवंडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, पुढील कायदेशीर कारवाई पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# भिंगार शहराच्या नियोजनबद्ध विकासासाठी निधी उपलब्ध; नगरपरिषदेसाठीही पाठपुरावा सुरू - आमदार संग्राम जगताप

**| भिंगार पंचशील वेश ते साईबाबा मंदिर रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन**

**| भिंगारच्या प्रभाग क्रमांक ६ व ७ मध्ये रस्ता काँक्रिटीकरण, गटार व फुटपाथच्या कामांना सुरुवात**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भिंगार छावणी परिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक ६ व ७ मधील पंचशील वेश ते साईबाबा मंदिर या मार्गावरील रस्ता काँक्रिटीकरण, गटार व फुटपाथच्या कामाचे भूमिपूजन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. आमदार जगताप यांच्या प्रयत्नातून या विकासकामासाठी निधी उपलब्ध झाला असून, या माध्यमातून परिसरातील अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला महत्त्वाचा रस्त्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

या भूमिपूजनप्रसंगी वसंत राठोड, संजय छजलानी, अजिंक्य भिंगारदिवे, कोंडाराम वाघस्कर, शुभांगी साठे, संजय सपकाळ, श्याम वाघस्कर, राहुल पानसरे, सुदाम गांधले, संभाजी भिंगारदिवे, महेश नामदेव, सुनील लालबोंद्रे, रवी लालबोंद्रे, अमोल वाघस्कर, नामदेव लंगोटे, आप्पा घुले, मंगेश खताळ, शिवाजी दहीहंडी, सिद्धार्थ आढाव, अप्पा लोहार, संपत बेरड, दीपक लिपाने, अक्षय नागापुरे, बाळासाहेब पतके, ओमकार फिरोदे, सागर चव्हाण, मारुती पवार, यशवंत पानमळकर आदींसह भिंगार शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, भिंगार शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने काम केले जात असून नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामे मार्गी लावण्यावर भर दिला जात आहे. भिंगारला छावणी परिषद असल्यामुळे विकासकामे करताना विविध मंजुरीच्या अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे अनेकदा विकासकामांना विलंब होतो. मात्र, तरीदेखील पाठपुरावा करून कायमस्वरूपी विकासकामे मार्गी लावली जात आहेत.

भिंगार शहराची छावणी परिषद रद्द करून नगरपरिषद करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. भिंगार हे शहर ब्रिटिशकालीन कायद्याच्या चौकटीत असून छावणी परिषद बरखास्त होऊन नगरपरिषद स्थापन झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली.

आमदार जगताप म्हणाले की, विधानसभा मतदारसंघातील मूलभूत प्रश्नांची कामे यापूर्वीच मार्गी लागली असती तर आज आपल्याला वेगळ्या प्रश्नांवर काम करता आले असते. मात्र, मला मूलभूत प्रश्नांपासून कामाला सुरुवात करावी लागली. त्यातील अनेक प्रश्न आता मार्गी लागले असून रस्त्यांचीही बहुतांश कामे पूर्ण झाली आहेत.

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विकासकामे पूर्णत्वाकडे नेली जात आहेत. भिंगार शहरातीलही अनेक प्रश्न प्रलंबित होते. ते प्रश्न नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी पद्धतीने सोडविण्यासाठी टप्प्याटप्प्याने विकासकामे पूर्ण केली जात आहेत. जमिनीखालील प्रश्न आधी मार्गी लावून त्यानंतर रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यामुळे भविष्यात पुन्हा पुन्हा त्याच रस्त्यांवर काम करण्याची वेळ येणार नाही, याचे नियोजन केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. सर्वांनी जनतेच्या प्रश्नांसाठी एकत्र आले पाहिजे. विकासकामांमध्ये कोणीही राजकारण करू नये. कोणाला नारळ फोडायचा असेल तर त्यांनी येऊन नारळ फोडावा, त्याला आमचा विरोध नाही; मात्र विकासकामांमध्ये अडथळा निर्माण करू नये, असे आवाहन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

अहिल्यानगर शहरातील माळीवाडा बसस्थानकाचे कामही आपण मार्गी लावले असून, त्याच धर्तीवर भिंगार बसस्थानकाचे काम केले जाईल. शहराच्या विकासाच्या सर्व सुविधा भिंगारपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केला जाईल. भिंगार हे अहिल्यानगर शहराचे प्रवेशद्वार असून, या शहरासाठी चांगले काम उभे करू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी संजय सपकाळ म्हणाले की, भिंगार शहर विकासकामांपासून दुर्लक्षित राहिले होते. मात्र, आमदार संग्राम जगताप यांनी भिंगार शहराचा विकासकामांच्या माध्यमातून कायापालट करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. भिंगार शहरातील कॉलनी अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण, सामाजिक भवन आणि विविध विकासकामांसाठी सुमारे १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, त्या माध्यमातून अनेक विकासकामे मार्गी लागली आहेत. पंचशील वेश ते साईबाबा मंदिर हा रस्ता परिसरातील अत्यंत महत्त्वाचा असून या मार्गावर मोठी रहदारी असते. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न आता मार्गी लागत असल्याचे सपकाळ यांनी सांगितले. भिंगार शहरातील अग्निशामक दल, विद्युत दाहिनी, बाजारतळ सुशोभीकरण आणि नगरपरिषद हे प्रश्न अद्याप प्रलंबित असून, आमदार संग्राम जगताप हे प्रश्नही मार्गी लावतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# विद्याधामच्या ११ खेळाडूंची जिल्हास्तर मैदानी स्पर्धेसाठी निवड

**तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत २५ बक्षीसे | श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेचा तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेत जलवा**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेच्या ११ खेळाडूंची जिल्हास्तर मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे .

अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय व श्रीगोंदा तालुका क्रीडा समितीच्या वतीने तालुकास्तरीय शालेय मैदानी स्पर्धा छत्रपती महाविद्यालय श्रीगोंदा येथे संपन्न झाल्या . यामध्ये खेळाडूंनी २५ बक्षिसांची लयलुट करत ११ खेळाडूंची प्रवरानगर येथे होणाऱ्या जिल्हास्तर मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे .

१४ वर्ष वयोगट : - श्रावणी सातव - लांबउडी - प्रथम क्रमांक ,स्वरा वाघमारे - गोळा फेक - प्रथम क्रमांक , थाळी फेक - तृतीय क्रमांक ,सिद्धांत कोरके - अडथळा - द्वितीय क्रमांक ,अथर्व बनकर - थाळी फेक - तृतीय क्रमांक ,मुली ४१०० रिले - तृतीय क्रमांक १७ वर्ष वयोगट : - पायल लामखडे -१०० मीटर धावणे , लांब उडी व तिहेरी उडीत - प्रथम क्रमांक ,यश बनकर - ४०० मी अडथळा - प्रथम क्रमांक ,करण ठाणगे - लांब उडी - द्वितीय क्रमांक ,तिहेरी उडी - तृतीय क्रमांक अथर्व बोबडे -तिहेरी उडी - द्वितीय क्रमांक ,३००० मी . - तृतीय क्रमांक ,प्रांजल तरटे - २०० मीटर धावणे - तृतीय क्रमांक ,मुली ४ बाय १०० रिले - द्वितीय क्रमांक ,मुली ४ बाय ४०० रिले -द्वितीय क्रमांक १९ वर्ष वयोगट:- पायल सरडे - अडथळा - प्रथम क्रमांक ,प्रांजल धोत्रे - तिहेरी उडी - प्रथम क्रमांक ,सार्थक भोस -तिहेरी उडी - प्रथम क्रमांक , लांब उडी - दुसरा क्रमांक ,सार्थक ढवळे -तिहेरी उडी - तृतीय क्रमांक ,सृष्टी बनकर - १०० मी . धावणे - तृतीय क्रमांक , राक्षे ऋतुजा -२०० मीटर धावणे - तृतीय क्रमांक , मुली ४ बाय १०० रिले - प्रथम क्रमांक पटकावला . या खेळाडूंना क्रीडाशिक्षक संदीप घावटे , अमोल कातोरे , वंदना गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले .

या सर्वांचे संस्थेचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर , सचिव नंदकुमार निकम ,शाळा समितीचे अध्यक्ष चंदुलाल चोरडिया, क्रिडा समिती अध्यक्ष सचिन जामदार ,मुख्याध्यापक पी .जे . मेरगळ , पर्यवेक्षक एन .एस . डुंबरे , संजय देशपांडे , के .बी .काळे व सर्व ग्रामस्थांनी अभिनंदन करुन पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या .

# करवीर नगरी कोल्हापूरात दुमदुमणार, अहिल्यानगर कथा लेखक बाळासाहेब देशमुख यांचा कथाकथन आवाज

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** के एस आय पब्लिकेशन्स कोल्हापूर आयोजित ३१ वे राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलन कोल्हापूर येथे ०४ ऑक्टो. २०२६ रोजी ,भारत मंदिर सभागृह, गांधी मैदान येथे संपन्न होत आहे. साहित्य संमेलनाध्यक्षपदी संत साहित्य अभ्यासक ,व्याख्याते दत्तात्रय वारकड यांची निवड झालेली आहे.



साहित्य संमेलन आयोजक माननीय विलास पाटील यांनी पत्र पाठवून, कथालेखक श्री बाळासाहेब देशमुख यांना कथाकथन कार्यक्रमाकरिता निमंत्रित केलेले आहे.

कथालेखक बाळासाहेब देशमुख, कथाकथन कार्यक्रमात मंतरलेला वाडा ही कथा सांगणार आहेत. गावोगावी कीर्तन करणारे विसाजी विसपुते, छोट्या गावी कीर्तनास जातात. तिथे किल्ल्याच्या आकाराच्या भव्य वाड्यात प्रवेश करताच, घडत राहणाऱ्या थरारक गोष्टी, त्यांच्या लक्षात येतात. तोंडा समोरून उडणारी वटवाघळे, वाड्याच्या चारी भिंतीला लटकलेली कोळ्याची जाळे, आपोआप येणारे जेवणाचे ताट, माणसांची अलोट गर्दी, इनामदाराच्या बोलण्याने अंगावर येणारे शहारे, अशी रहस्यमय कथा सादर करणार आहेत. बाळासाहेब देशमुख यांचे आजवर अहिल्यानगर जिल्ह्यात ५०० प्रयोग पूर्ण झालेले आहेत. शिवाय विविध आकाशवाणी केंद्रावर १२० कथा प्रसारित झालेल्या आहेत. राज्यस्तरीय साहित्य संमेलन मध्ये त्यांचे आजवर ३८ कथाकथन प्रयोग पूर्ण झालेले आहेत.. त्यांच्या या निवडीबद्दल ज्येष्ठ साहित्यिक सदानंद भणगे, बाबुराव उपाध्ये , सुनील गोसावी, डॉ बाळासाहेब कोठुळे,दिलीप कापसे, रूपचंद शिदोरे , सुरेखा घोलप यांनी अभिनंदन केले आहे.

# आडूळमध्ये मोटार रिवाइंडिंग दुकान पुन्हा फोडले

**चोरट्यांचा तांब्याच्या तारांसह साहित्यावर डल्ला; वाढत्या चोरीच्या घटनांमुळे व्यापाऱ्यांमध्ये चिंता**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पैठण–**आडूळ येथील कासमभाई पठाण यांच्या मोटार रिवाइंडिंग दुकानाला चोरट्यांनी पुन्हा लक्ष्य करत दुकान फोडल्याची घटना समोर आली आहे. चोरट्यांनी दुकानातील तांब्याच्या तारा तसेच अन्य मोटार रिवाइंडिंग साहित्य लंपास केल्याचे सांगण्यात येत आहे.

दुकान फोडल्याचे निदर्शनास आल्यानंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. या घटनेमुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आडूळ परिसरात वाढत्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली असून चोरीचा पंचनामा करून चोरट्यांचा शोध घेण्याची मागणी करण्यात आली आहे. यापूर्वीही याच दुकानाला चोरट्यांनी लक्ष्य केले होते, त्यामुळे पोलिसांनी या प्रकरणाचा गांभीर्याने तपास करण्याची गरज व्यक्त होत आहे.

# ‘पीएम सूर्य घरमोफत वीज योजने’चा आ. दातेंच्या हस्ते शुभारंभ

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** केंद्र सरकारच्या ‘पीएम सूर्य घरमोफत वीज योजना’ अंतर्गत पारनेरनगर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना सौरऊर्जेचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष मोहीमेचा शुभारंभ आमदार काशिनाथ दाते सर यांच्या हस्ते करण्यात आला. घरांवर सोलर पॅनेल बसवून वीज बिलाचा खर्च कमी करणे तसेच नागरिकांना सौरऊर्जेचा पर्याय उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

या विशेष मोहिमेअंतर्गत १ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत सोलर सिस्टीम बसविण्यासाठी विशेष दर व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. केंद्र सरकारच्या पीएम सूर्य घर योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना ३ किलोवॅटपर्यंतच्या सोलर सिस्टीमसाठी एकूण ७८ हजारांपर्यंत केंद्रीय अनुदान मिळू शकते. तसेच राष्ट्रीयकृत बँकांच्या माध्यमातून कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. दिलेल्या माहितीनुसार, ३ किलोवॅट सिस्टीमची विशेष किंमत १ लाख ६० हजार, २ किलोवॅटसाठी १ लाख १० हजार, तर ५ किलोवॅटसाठी २ लाख ५० हजार अशी ठेवण्यात आली आहे. सोलर पॅनेल, इन्व्हर्टर, सर्व्हिसिंग व इतर सुविधांबाबत संबंधित विक्रेत्याकडून वॉरंटी व सेवा देण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

या शुभारंभप्रसंगी जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड, भाजप नेते राहुल पाटील शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंत चेडे, कार्याध्यक्षा सुधामती कवाद, शहराध्यक्ष कविता औटी, उपाध्यक्ष सोनाबाई चौधरी, नगरसेवक अशोक चेडे, नगरसेवक युवराज पठारे, कांतीलाल ठाणगे, भाऊ ठुबे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस सुभाष दुधाडे, दत्ता पवार, तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष राजु औटी, अपर्णा खामकर, सुनील गाडगे, उद्योजक मंगेश दाते, विठ्ठल कवाद, माउली औटी, प्रताप आंबुले, लहू भालेकर, प्रदीप नगरे, सोनाली चत्तर, बाळासाहेब सोबले, सुभाष थोरात, रोहिदास लामखडे, संजय औटी, निसार शेख, हिरामण सोनवणे, अमोल चौधरी, मधुकर जाधव, चौधरी साहेब, नियाज राजे, रामराव गाडेकर, सुभाष औटी, निलेश कटारिया, अजित पळसे, अक्षय खताळ यांच्यासह सोलार चे प्रशांत शिंदे, अनंत सिद्धेश्वर, अमोल मेडे, महेश रनवे, सुरज धाडगे हे उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले की, सामाजिक आणि राजकीय जीवनात काम करत असताना वीजपुरवठा तसेच लोडशेडिंगच्या समस्येबाबत नागरिकांचे वारंवार फोन येतात. त्यामुळे नागरिकांच्या या समस्येवर दीर्घकालीन पर्याय उपलब्ध व्हावा आणि वीज खर्चात बचत व्हावी, या उद्देशाने सौरऊर्जेचा पर्याय अधिकाधिक घरांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. सोलर संच बसविणाऱ्या संबंधितांकडून नागरिकांना योग्य मार्गदर्शन व सेवा देण्याबाबत विश्वास देण्यात आला आहे.

या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी लाईट बिल, आधार कार्ड, बँक पासबुक, पासपोर्ट फोटो, घरपट्टी किंवा ७/१२ उतारा तसेच वीज बिलाशी जोडलेला मोबाईल क्रमांक अशी आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत. नागरिकांनी सोलर संच बसविण्यापूर्वी योजनेची पात्रता, अधिकृत अनुदान, अंतिम किंमत, कर्जाच्या अटी तसेच वॉरंटी व सेवा यांची संबंधितांकडून खात्री करून घ्यावी.या उपक्रमासंदर्भात अधिक माहितीसाठी आमदार काशिनाथ दाते जनसंपर्क कार्यालय, पारनेर येथे संपर्क साधावा.

> **सौर सोलर घर योजना माध्यमातून सोलर प्रकल्प उभारताना संपूर्ण प्रक्रिया ग्राहकांसमोर पारदर्शक ठेवण्याला आम्ही सर्वोच्च प्राधान्य देत आहोत. सोलर सिस्टीमची किंमत, अनुदान, कर्ज सुविधा, उपकरणांची माहिती, वॉरंटी तसेच सर्व्हिसिंग याबाबत ग्राहकांना सुरुवातीपासून स्पष्ट माहिती दिली जाईल. कोणतीही लपविलेली आकारणी न ठेवता ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार योग्य पर्याय उपलब्ध करून देणे आणि स्थापनेनंतरही सेवा-सपोर्ट देणे, ही आमची जबाबदारी आहे. ग्राहकांचा विश्वास आणि समाधान हीच आमच्या कामाची खरी पारदर्शकता आहे.''**
>
> **- प्रशांत शिंदे**


(पान १ वरून)


## ऑक्टोबर महिन्यात ‘सायबर सुरक्षितता’ अभियान

वापर करावा. इंटरनेटवर सापडलेल्या अनोळखी क्रमांकावर संपर्क करून आर्थिक अथवा वैयक्तिक माहिती देऊ नये.

**रिमोट-ॲक्सेस ॲप डाउनलोड करू नका**

तांत्रिक मदत किंवा खाते पडताळणीच्या नावाखाली सायबर गुन्हेगारांकडून मोबाईलमध्ये स्क्रीन-शेअरिंग किंवा रिमोट-ॲक्सेस ॲप डाउनलोड करण्यास सांगितले जाऊ शकते. अशा अनोळखी ॲप्सना परवानगी देऊ नये. विशेषतः बँकिंग व्यवहार सुरू असताना स्क्रीन शेअर करू नये आणि अनोळखी व्यक्तीला मोबाईलचा ताबा देऊ नये.

‘ बंद होणार’, ‘ अपडेट करा’, ‘बँक खाते गोठवले जाईल’ अशा संदेशांमधील लिंकवर क्लिक करण्यापूर्वी त्याची सत्यता तपासावी.

मोबाईल क्रमांक, आधार, , बँक खाते किंवा कार्डची माहिती अनोळखी व्यक्तींना देऊ नये. बँक खात्यातील व्यवहारांचे किंवा ॲप अलर्ट नियमितपणे तपासावेत.

मोबाईलचे ऑपरेटिंग सिस्टिम आणि आवश्यक ॲप्स अद्ययावत ठेवावेत. अनोळखी ॲप्स डाउनलोड करू नयेत तसेच त्यांना अनावश्यक परवानग्या देऊ नयेत. सार्वजनिक - वापरून संवेदनशील आर्थिक व्यवहार करणे शक्यतो टाळावे. सोशल मीडिया खात्यांसाठी मजबूत पासवर्ड आणि उपलब्ध असल्यास दोन-स्तरीय सुरक्षा वापरावी.

**फसवणूक झाल्यास तातडीने तक्रार करा**

सायबर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच घाबरून न जाता १९३० या राष्ट्रीय सायबर क्राईम हेल्पलाइनवर तातडीने संपर्क साधावा. तसेच ... या राष्ट्रीय सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टलवर तक्रार नोंदवावी.

फसवणुकीनंतर विलंब न करता तक्रार करणे महत्त्वाचे आहे. व्यवहाराची तारीख, वेळ, रक्कम, / , मोबाईल क्रमांक, स्क्रीनशॉट, संशयास्पद लिंक, ई-मेल किंवा संदेश यांसारखे उपलब्ध पुरावे जतन करावेत. संशयित व्यक्तीशी पुढील कोणताही आर्थिक व्यवहार करू नये.‘घाई करू नका, घाबरू नका, पडताळणी केल्याशिवाय पैसे देऊ नका’ हा सायबर सुरक्षेचा मूलमंत्र नागरिकांनी लक्षात ठेवावा. स्वतःबरोबरच कुटुंबातील ज्येष्ठ नागरिक, महिला आणि डिजिटल व्यवहाराची कमी माहिती असलेल्या व्यक्तींनाही सायबर फसवणुकीच्या पद्धतींबाबत जागरूक करावे. सण आनंदाने आणि सुरक्षितपणे साजरे करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने डिजिटल व्यवहारात आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केले आहे.

## सेवा सोसायटी मतदारसंघातून आ. दाते; तर बिगरशेतीतून प्रशांत गायकवाड उमेदवारी अर्ज दाखल

काशिनाथ दाते सर यांनी महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांचा निर्णय अंतिम मानून पुढील भूमिका राहील, असे स्पष्ट केले. जिल्हा बँक ही शेतकरी आणि सहकार क्षेत्राशी निगडित महत्त्वाची संस्था असल्याने व्यापक हिताचा विचार करून निवडणूक बिनविरोध करण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या चर्चेलाही त्यांनी दुजोरा दिला.

‘‘मी माझ्या समवेत प्रशांत गायकवाड व त्यांच्या धर्मपत्नी सौ. सोनल गायकवाड यांचे वेगवेगळ्या मतदारसंघातून जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे. मात्र, मी महायुतीचा प्रतिनिधी म्हणून ही भूमिका बजावली असून महायुतीच्या घटक पक्षांतील वरिष्ठ नेते जी भूमिका घेतील, ती आम्हा सर्वांना मान्य असेल. संगमनेर येथे दोन-तीन दिवसांपूर्वी जिल्ह्यातील विविध पक्षांच्या निवडक पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. अहिल्यानगर जिल्हा बँक ही महाराष्ट्रातील अग्रगण्य बँक असून, शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून ही निवडणूक बिनविरोध करण्याबाबत त्या बैठकीत सर्वानुमते भूमिका मांडण्यात आली, त्यामुळे महायुतीचे वरिष्ठ नेते पुढील काळात जो निर्णय घेतील, तो आम्हा सर्वांना मान्य असेल.

- आमदार काशिनाथ दाते सर

## सफाई कर्मचारी हेच शहराचे खरे आरोग्यदूत - महापौर ज्योतीताई गाडे

महापालिका कर्मचारी पतसंस्था किंवा बँकेकडून कर्ज घ्यावे. खासगी सावकारीच्या मार्गाला जाऊ नये, असे आवाहन आयुक्तांनी केले.

शहरातील मुख्य रस्त्यांवर ठिकठिकाणी कचरा फेकलेला दिसतो. हा कचरा सफाई कर्मचाऱ्यांनी पोत्याद्वारे गोळा करून एका ठिकाणी जमा करावा आणि घंटागाडीच्या माध्यमातून तो उचलण्यात यावा. सफाई कर्मचाऱ्यांनी दोन सत्रांमध्ये काम करावे, जेणेकरून २४ तास शहर स्वच्छ दिसण्यास मदत होईल.

आपले शहर छोटे असून ते स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी सर्वांची आहे. त्यामुळे प्रत्येक सफाई कर्मचाऱ्याने आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडावे, असेही आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने सफाई कर्मचाऱ्यांची एक्स-रे, रक्तदाब, शुगर आणि रक्त तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर आवश्यकतेनुसार मोफत औषधोपचार व औषधांचे वाटप करण्यात आले. या आरोग्य शिबिराचा मोठ्या संख्येने सफाई कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला. आयुक्त यशवंत डांगे यांनी स्वतः जातीने लक्ष देत सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्य तपासणीची पाहणी केली. ते थेट सफाई कर्मचाऱ्यांमध्ये जाऊन त्यांची विचारपूस करीत होते. यावेळी सफाई कर्मचाऱ्यांमध्ये आयुक्तांसोबत छायाचित्र काढण्यासाठी उत्साहाचे वातावरण दिसून आले. आयुक्त डांगे यांनीही यावेळी स्वतःच्या आरोग्याची तपासणी करून घेतली.

शिबिराच्या निमित्ताने महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे आणि सफाई कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेची शपथ घेतली. आपले शहर स्वच्छ, सुंदर आणि हरित ठेवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. नागरिकांच्या आरोग्यासाठी स्वच्छता महत्त्वाची असून, शहर स्वच्छ ठेवण्यामध्ये सफाई कर्मचारी आणि नागरिक या दोघांचीही भूमिका महत्त्वाची असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

## टंचाई परीस्थीतीला सामोरे जाताना प्रशासकीय यंत्रणेने संवेदनशीलपणे काम करावे- ना. राधाकृष्ण विखे पाटील

प्रश्नाचा आढावा घेवुन,कृष्णा खोर्यातील अतिरिक्त पाणी जामखेड तालुक्याला मिळावे आशी अपेक्षा व्यक्त केली.शासनाने दुष्काळी परीस्थीतीतीला सामोरे जाण्यासाठी सर्व निर्णय केले आहेत.प्रभावी अंमलबजावणीची जबाबदारी अधिकार्यांची आहे.कोणाला खूष करण्यासाठी चुकीची माहीती देवू नका. पीक विमा वीज प्रश्न जलजीवन मिशनच्या योजनाबाबत प्रशासनाने अधिक गांभीर्याने काम करण्यची गरज सभापती राम शिंदे यानी व्यक्त केली.याप्रसंगी आ.सुनिल कर्जतकर यांनी सूचना केल्या.

## नागरिकांनी जबाबदारीची स्वयंशिस्त लावावी - आमदार संग्राम जगताप

रस्त्यावर कचरा आणून टाकणाऱ्यांवर महापालिका प्रशासनाने दंडात्मक कारवाई केली पाहिजे. शहरात पोलिसांनी बसविलेले सीसीटीव्ही कॅमेरे अनेक ठिकाणी बंद असले तरी व्यावसायिक तसेच नागरिकांच्या घरांवरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून कचरा टाकणाऱ्यांचा शोध घेऊन प्रशासनाने कारवाई करावी, अशी अपेक्षाही जगताप यांनी व्यक्त केली.

समाजामध्ये काळानुसार बदल होणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीने स्वच्छतेबाबत पुढाकार घेऊन स्वयंशिस्त लावून घेणे गरजेचे आहे. पहिलीच्या विद्यार्थ्यांपासूनच सामाजिक कार्य आणि स्वच्छतेची माहिती देऊन जनजागृती करावी. आपण खाल्लेल्या चॉकलेटचा कागद रस्त्यावर न टाकता कचरापेटीतच टाकावा, अशी सवय लहान मुलांमध्ये रुजविण्याची गरज आहे. संत गाडगेबाबांनी कीर्तनाच्या माध्यमातून गावोगावी फिरून स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले, तरीही नागरिकांमध्ये अपेक्षित बदल झालेला नाही. आपण अजूनही मागे का आहोत, याचे आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

नागरिकांनी आपली जबाबदारी ओळखून स्वयंशिस्त लावली पाहिजे. कचरा उचलण्यासाठी बाहेरून कोणीही येणार नाही; मात्र महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे श्री सदस्य स्वतःहून शहरात येऊन स्वच्छता करत आहेत, ही कौतुकास्पद बाब आहे. त्यांचे विचार प्रत्येकाने आत्मसात केले पाहिजेत. शहरात घंटागाडी फिरत असून नागरिकांनी आपला कचरा घंटागाडीतच टाकावा. घंटागाडीत कचरा न टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी. स्वच्छतेबाबत लोकचळवळ उभी करून अहिल्यानगर शहर स्वच्छ, सुंदर आणि हरित करण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे, असे आवाहन जगताप यांनी केले.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, स्वच्छतेमध्ये देव आहे. संत गाडगेबाबांनी गावोगावी फिरून हातात झाडू घेत स्वच्छतेचे महत्त्व समाजाला पटवून दिले. त्यांनी दिलेला हा विचार पुढे नेण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे आणि आज श्री सदस्य तेच काम करत आहेत. स्वच्छतेची जबाबदारी केवळ शासन किंवा प्रशासनाची नसून प्रत्येक नागरिकाची आहे. आपले घर, परिसर, शहर आणि देश स्वच्छ राहण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेतला पाहिजे. स्वच्छता ही आरोग्याची गुरुकिल्ली आहे, असे महापौर ज्योतीताई गाडे यांनी सांगितले.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, गांधी जयंतीनिमित्त सेवा संकल्प अभियानांतर्गत ‘स्वच्छता हीच सेवा’ समजून प्रत्येकाने आपल्या परिसरासाठी एक दिवस, एक तास स्वच्छतेसाठी द्यावा. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या माध्यमातून वर्षभरात पाच स्वच्छता मोहिमा शहरात राबविण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या श्री सदस्यांना एका फोनवरून आवाहन करण्यात आले आणि त्यांनी कोणत्याही आदेशाची वाट न पाहता शहरात स्वच्छतेला सुरुवात केली. संत महंतांचे थोर सामाजिक कार्य त्यांचे विचार समाजापर्यंत घेऊन जाण्याचे काम आपल्या सर्वांना करावे लागणार आहे त्यांचे अनुकरण. श्री सदस्यांनी स्वतःचे साहित्य आणून अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने शहरात स्वच्छतेचे काम केले, असे डांगे यांनी सांगितले.